कोरोना
मुस्लिमांनी हिंदूंना केलेली मदत

विलास रणसुभे



kalimajeem.blogspot.in

kalimajeem.blogspot.in

कोरोना :
मुस्लिमांनी हिंदूंना केलेली मदत

विलास रणसुभे

श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर

कोरोना : मुस्लिमांनी हिंदूंना केलेली मदत

- विलास रणसुभे

Corona : Muslimani Hinduna Keleli Madat

- Vilas Ransubhe

© श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर

पहिली आवृत्ती : ऑक्टोबर, २०२०

मूल्य : ₹ २०/-

मुद्रक
भारती मुद्रणालय
शाहूपुरी, चौथी गल्ली,
कोल्हापूर - ४१६ ००१
फोन : (०२३१) २६५४३२९

प्रकाशक
श्रमिक प्रतिष्ठान,
रेडफ्लॅग बिल्डिंग, बिंदू चौक,
कोल्हापूर

श्रमिक प्रतिष्ठान, लेखकाच्या मताशी सहमत असेलच असे नाही.

kalimajeem.blogspot.in

मनोगत

कोरोना काळात 'मुस्लीम समाजाने हिंदूंना केलेली मदत' या विषयावर पुस्तिका लिहावी असे ठरले. निरनिराळ्या माध्यमातून माहिती गोळा करीत असताना असे लक्षात आले की, या विषयावर एक मोठा ग्रंथ होईल इतकी माहिती मिळत होती. तेव्हा असे ठरविले की, हा विषय महाराष्ट्रापुरता मर्यादित ठेवावा. पुन्हा असे लक्षात आले ही देखील माहिती पुष्कळ आहे. तेव्हा हा विषय अंत्यसंस्कारापर्यंत मर्यादित असावा. वस्तूंचे वाटप, कोविड रुग्णालय, वेगवेगळ्या पातळीवरील मदत असे विषय घेऊ नयेत. दहन या विषयावर महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्याचा आढावा घेण्यापेक्षा मोठी शहरे, पश्चिम महाराष्ट्रातील दोन-तीन शहरे, विदर्भातील दोन शहरे, उत्तर महाराष्ट्र, मराठवाड्यातील शहरे अशी विभागणी करून माहिती मिळवून 'कोरोना काळातील मुस्लीम समाजाने हिंदूंना केलेली मदत' या विषयावर पुस्तिका तयार झाली.

कोरोनाच्या काळात मुस्लीम समाज प्रेतदहनाचे व इतर जे कार्य करीत आहे त्यामागील प्रेरणा कोणत्या, याबद्दल त्यांच्याशी चर्चा करून माहिती घेतली. त्यातील काही मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत- १) मानवतावादी भूमिकेतून आम्ही कार्य करतो. २) इस्लाम धर्माची प्रेरणा आहे. ३) दीर्घकाळापासून एकत्रित आहोत, ते संकटात आहेत म्हणून करीत आहोत. ४) छ. शिवाजी महाराज, छ. शाहू यांच्या कार्याची प्रेरणा आहे. ५) तुम्ही जमिनीवरील मानवाला मदत करा. अल्लाह तुम्हाला आकाशात मदत करेल. इ.

संपूर्ण पुस्तिकेतील माहिती वृत्तपत्रातील बातम्या, मित्रांनी ठिकठिकाणची पाठविलेली माहिती. ही सर्व माहिती अधिकृत आहे की नाही ते तपासून घेण्यात आले.

या विषयावर लेखन करीत असताना त्याचे सामाजिक, धार्मिक विश्लेषण मुद्दाम टाळण्यात आले. सामान्य माणसाने त्यांच्या सद्सद्विवेकबुद्धीनुसार, आपल्या स्थानिक गट, संस्था, संघटनांमार्फत केलेले कार्य आहे. त्याला कोणताही राजकीय आश्रय नाही. वस्तू वाटप करून वृत्तपत्रात पानभर जाहिरात देणे असा त्याचा हेतू नाही. म्हणून सामान्यांनी केलेले हे असामान्य कार्य आहे. असे कार्य सामान्य जनतेपर्यंत पोहचविणे हाच या पुस्तिकेचा उद्देश ठरविण्यात आला. ज्या सामान्य माणसाला धर्माच्या नावाने दंगेखोर बनविण्याचे कार्य केले जाते, त्या

सामान्य माणसाने जागरूक व्हावे, हीच अपेक्षा आहे.

नव्वद टक्के टी.व्ही. चॅनलवाले, काही वृत्तपत्रे, समाजमाध्यमे तरुणातील माणुसकी नष्ट करून त्याच्या मनात दुसऱ्या धर्माबद्दल द्वेष निर्माण करीत आहेत. अशा प्रसंगी मुस्लीम तरुण हिंदूंच्या प्रेताचे हिंदू रीतीरिवाजाप्रमाणे दहन करीत आहेत. याची दखल समाजातील इतर घटकांनी घ्यावी, यातून इतरांना प्रेरणा मिळावी हा पुस्तिकेचा उद्देश आहे. हिंदूंचा प्रेतदहन हा अतिसंवेदनशील विषय आहे तरी मुस्लीम समाज हे कार्य करीत आहे.

हिंदूंच्या प्रेताचे दहन करणाऱ्या मुस्लीम संघटना, संस्था, गट, मंच यांचे सत्कार त्या त्या गावातील हिंदूंनी करावेत हे त्यांचे कर्तव्य आहे. ते विनामोबदला कार्य करीत आहेत. त्यांच्या कुटुंबांना मदत केली पाहिजे, हे हिंदूंचे कर्तव्य आहे.

सर्वधर्मीय प्रेताचे दहन- कोरोनापूर्वी कोल्हापुरात काही संघटना (उदा. व्हाईट आर्मी, बैतुलमाल कमिटी इ.) करीत आहेत. महाराष्ट्रात इतर ठिकाणीही असे कार्य होत असेल.

महाराष्ट्रात मराठी दैनिकांच्या अनेक आवृत्त्या प्रसिद्ध केल्या जातात. एका आवृत्तीतील बातमी दुसऱ्या आवृत्तीत असेल याची खात्री नाही. शेजारच्या जिल्ह्यातील बातमी आपल्याला कळत नाही. हे आवृत्त्यांमुळे घडत आहे. म्हणून मुस्लीम समाजाचे प्रेतदहनाचे कार्य संपूर्ण महाराष्ट्राला कळावे या हेतुने ही पुस्तिका प्रसिद्ध करीत आहोत.

या पुस्तिकेचा इतर भाषेत कोणी अनुवाद करीत असेल तर तात्काळ मान्यता मिळेल. ही पुस्तिका जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचविणे हाच एकमेव हेतू आहे. तसेच प्रत्येक वाचकाचेही हे कार्य आहे.

या पुस्तिकेसाठी श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूरचे माझे मित्र आनंदराव परुळेकर, एस. बी. पाटील, चिंतामणी मगदूम यांचे सहकार्य लाभले. तसेच प्रा. डॉ. एस. ए. बोजगर, प्रा. टी. के. सरगर, इम्तियाज मुनशी, मेहबूब बोजगर यांचा आभारी आहे. कोरोना लढ्यातील योद्धे अंजुम इनामदार (पुणे), जाफरबाबा, कादरभाई (कोल्हापूर), जावेद जाकिरिया-मेमन (अकोला), हाजी पटेल (लोणावळा) यांच्या सहकार्याशिवाय ही पुस्तिका पूर्ण होऊ शकली नसती म्हणून मी त्यांचा आभारी आहे.

पुस्तिकेची छपाई भारती मुद्रणालयने वेळेत केल्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे.

२ ऑक्टोबर, २०२०

आपला नम्र,

विलास रणसुभे

पार्श्वभूमी

कोरोनाच्या सुरूवातीस मुस्लीम समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन

कोरोनाला सुरूवात झाली त्यावेळी इलेक्ट्रॉनिक माध्यमे, प्रिंट मीडिया, समाजमाध्यमांनी मुस्लीम समाजाबाबत केलेल्या वाईट व खोट्या प्रचाराचे मुद्दे खालीलप्रमाणे :

१) देशातील एकूण मुस्लीम लोकसंख्येच्या ३०% मुस्लीम कोरोनाबाधित आहेत.
२) मुस्लीम फेरीवाल्यांकडून भाजी, फळे विकत घेऊ नका.
३) मुस्लीम फळविक्रेते फळांना थुंकी लावून फळे विकतात, त्यामुळे कोरोनाचा प्रसार होत आहे.
४) देशातील सर्व मस्जिदमध्ये मुस्लीम नमाज पडतात. सामाजिक अंतर पाळत नाहीत.
५) मुस्लीम पॉझिटिव्ह रुग्ण आपले नाव बदलून बहुसंख्य हिंदू असलेल्या ठिकाणी मुद्दाम वावरतात.
६) मुस्लिमांना घरकामे व इतर कामे देऊ नका, ते कोरोनाचे वाहक आहेत.
७) मुस्लीम हे छुपे कोरोना बॉम्ब आहेत.
८) दिल्लीतील निझामुद्दीन ठिकाण, मरकझ ही कोरोना फॅक्टरी आहे.
९) आपल्याला कोरोनाच्या चक्रव्युहात कुणी ढकललं?
१०) कोरोनाच्या प्रसार तबलिकी जमातमुळेच झाला.

वरील बरेच मुद्दे टी.व्ही. चॅनलवाल्यांचे प्राईम टाईमच्या चर्चेचे विषय होते. यात राष्ट्रीय चॅनलसोबत मराठी चॅनलचाही सहभाग होता. या सर्व चर्चेतून मुस्लिमांकडे संशयाने पाहिले पाहिजे, असे बिंबविण्यात आले.

आज मुस्लीम समाजातील अनेक संस्था, संघटना भेदभाव न करता हिंदूंना मदत करीत आहेत. हिंदूंची प्रेतं, त्यांची मुलं, नातेवाईक स्वीकारत नाहीत, तेव्हा हिंदू रीतीरिवाजाप्रमाणे प्रेतांचे दहन मुस्लीम करीत आहेत. मीडिया, वृत्तपत्रे डोळे बंद करून बसले आहेत, त्यांना वास्तव दिसत नाही. हिंदूंच्या प्रेतांना अग्नी देणाऱ्या मुस्लीम संस्था, संघटनांचे अध्यक्ष, कार्यकर्त्यांना

प्राईम टाईमच्या चर्चेमध्ये सहभागी होण्याचे निमंत्रण दिले जात नाही. बहुसंख्य मराठी वृत्तपत्रात बातम्याही येत नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. अपवाद काही बातम्या आल्या आहेत पण त्या दखल घ्याव्यात अशा नाहीत.

मदरशांकडे नेहमीच संशयाने पाहण्याचा दृष्टीकोन तयार करण्यात आला. आज बहुसंख्य मदरसे, मशिदीचे हॉल सुसज्ज क्वारंटाइन सेंटर, रुग्णालये म्हणून रूपांतरित करण्यात आली. काही मुस्लीम संस्था, संघटनांनी शासनाची मदत न घेता पन्नास लाखाची आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त कोविड सेंटर सुरू केली आहेत. या पुस्तिकेतून हिंदू-मुस्लीम अशी तुलना करणे हा हेतू नाही. वास्तव परिस्थिती कशी आहे, हे सांगणे गरजेचे आहे.

भारतात कोरोनाचा प्रसार मुस्लीम समाजाने केला, असे वातावरण सुरूवातीस करण्यात आले. त्यात प्रसार माध्यमांची भूमिका महत्त्वाची आहे. कोरोनाशी प्रशासनासह डॉक्टर, नर्स, आशा वर्कर्स, पोलीस, सफाई कामगार, शिक्षक इ. त्यात प्रेतांना अग्नी देणारे मुस्लीम कार्यकर्तेही आहेत. अत्यंत जोखमीचे कार्य ते करीत आहेत. आपण त्यांना कोरोना योद्धे म्हटले पाहिजे. मुस्लीम संघटना गाजावाजा न करता, अत्यंत संयमाने, हिंदू धर्माचे सर्व नियम पाळून हिंदूंच्या प्रेतांना अग्नी देत आहेत, याची नोंद इतिहासाला घ्यावी लागेल असे कार्य देशभर चालू आहे.

कोरोनाच्या पहिल्या टप्प्यात मुस्लिमांकडून भाजीपाला, फळे घेऊ नका असा प्रचार केला गेला.

"माझे वडील कोरोनामुळे वारले. मी प्रेत ताब्यात घेण्यास तेथे आल्यास मला कोरोना होईल. तुम्हीच त्यांचे दहन करा", असे फोन मुस्लीम कार्यकर्त्यांना येत आहेत. तेव्हा प्रश्न असा निर्माण होतो की, हिंदू-मुस्लीमात विष पसरविणारे कोण आहेत.

कोरोनाचा प्रसार करणारे मुस्लीम आहेत, असा दावा प्रसार माध्यमांनी केला. त्या प्रचाराला बळी पडून अनेकांनी मान्यही केले. ज्यांना कोरोना प्रसारक म्हणून बदनाम केले त्यांनाच भेटून, 'माझी आई कोरोनाने मृत्यू झाली. मी प्रेत ताब्यात घेण्यास येत नाही. माझ्या अडचणी समजून घ्याव्यात. माझे नाव प्रसारमाध्यमांना सांगू नका', अशी विनंती करीत आहेत. अशा अनेक घटना घडत आहेत.

मुस्लीम संस्था, संघटनांचे कार्य फक्त शहरी विभागातच नाही ते ग्रामीण भागातही आहे. कोणीही कोणत्याही एका समाजाची, धर्माची उपेक्षा करू नये. ज्यांना आपण बदनाम केले तेच आपल्या मदतीला येत आहेत, हे आपण

विसरू नये.

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात मुस्लीम समाजाने कोरोना काळात कमी-अधिक प्रमाणात हिंदू समाजाला मदत केली आहे. अशी मदत करणारे मुस्लीम श्रीमंत नाहीत. छोटे-मोठे व्यवसाय करणारे, मध्यमवर्गीय मुस्लीम आहेत. यातील काहींची परिस्थिती जेमतेम आहे. तरी ही एक मानवतावादी भूमिका घेऊन ते कोरोनाग्रस्तांना मदत करीत आहेत.

कोरोना हा संसर्गजन्य असल्यामुळे कोरोना झालेल्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर तो आजार प्रेताजवळ गेल्यावर आपल्यास होईल ही भीती आहे आणि त्यात तथ्यही आहे. अशा प्रसंगी मृत्यू झालेल्या व्यक्तीचे प्रेत घेण्यासाठी त्याचे रक्ताचे नाते असलेली मुलं, मुली, पत्नी, पती, नातेवाईक, मित्रमंडळी कोणीही पुढे येण्यास धजावत नाहीत. कोणा व्यक्तीला पैसे देतो, हे अंत्यसंस्काराचे कार्य करा, असे म्हटल्यास कोणीही पुढे येण्यास तयार नाही. अशा प्रसंगी आपला जीव धोक्यात घालून, मानवतावादी भूमिकेतून धर्म, जात यातील भेद विसरून मुस्लीम समाज संपूर्ण महाराष्ट्रात हिंदूंच्या प्रेतांवर अंतिम संस्कार करण्याचे काम करीत आहे. यामध्ये नि:स्वार्थी भावना आहे. मानवतावादी वृत्ती आहे.

मुस्लीम समाजाने केलेल्या या कार्याची माहिती आपण महाराष्ट्रातील शहर व गावांची क्रमवार पद्धतीने घेऊ.

मुंबई : बडा कब्रस्तान मुंबई येथील मरिन लाईन्स या ठिकाणी आहे. कोरोनाने मृत्यू पावलेले अनेक मृतदेह येथे दररोज अंतिम संस्कारासाठी येतात. एकीकडे दफनविधी तर दुसऱ्या बाजूला अग्निसंस्कार. सय्यद रिज्वान आणि अल्ताफ कुरेशी हे दोघेजण अनेक दिवसांपासून, बडा कब्रस्तानमध्ये हिंदू रीतीरिवाजाप्रमाणे मृतदेहावर अंत्यसंस्कार करीत आहेत. मृतदेहामध्ये बहुसंख्य वृद्ध आहेत. बडा कब्रस्तानमध्ये मुस्लीम तरुण हिंदू धर्माचे सर्व रीतीरिवाज पार पाडत मृतदेहांवर संस्कार करीत आहेत.

कोरोना आजार आल्यापासून मुंबईतील कब्रस्तान, स्मशानभूमीमध्ये काम करणारे लोक गायब आहेत; पण बडा कब्रस्तान सगळ्यांसाठी खुला आहे. बडा कब्रस्तानमध्ये हिंदूंच्या प्रेतांचे फक्त दहनच केले नाही तर त्यांच्या कुटुंबीयांना व्हिडिओ कॉलद्वारे अंतिम संस्कारही दाखविले आणि ज्यांनी मागितल्या त्यांच्या घरी अस्थी पोचवल्या. त्यासाठी एक पैसाही आकारला नाही. उलट भटजीला दक्षिणा दिली. वीस फुटांवरून भटजी सूचना देत होता आणि नमाजी टोपीधारी मुसलमान हिंदूमंत्र बोलत शेवटचा अग्नी देत होते.

कुपर हॉस्पिटलमधील पहिलं हिंदू प्रेत घेऊन टिपिकल मुसलमानी पेहरावातील सहाजण ओशिवऱ्याच्या स्मशानभूमीत पहिल्यांदा पोचले तेव्हा, स्मशानातले कर्मचारी घाबरले. पण त्यांच्याकडे मृत्यूचं अधिकृत सर्टिफिकेट होतं आणि कुटुंबीयांचा व्हिडिओ मेसेज होता. तेव्हा स्मशानभूमीतले कर्मचारी तयार झाले. पहिल्या दिवशी त्या मुस्लीम कार्यकर्त्यांना नवीनच असल्याने, अनुभव नसल्याने अडचण निर्माण झाली. पण माहिती घेत त्यांनी तो अंतिम संस्कार पार पाडला.

हिंदूंमध्ये अंतिम संस्कारांची एक समान प्रथा नाही. जाती, पंथानुसार अनेक प्रथा आहेत. कुटुंबीयांनी सांगितलं तसं प्रत्येक प्रथेचं पालन मुस्लीम तरुणानी केलं. एका कुटुंबात तर मुलगीच होती. नातेवाईक यायला तयार नव्हते. इक्बाल ममदानी त्या मुलीला घेऊन बाणगंगेवर गेले. त्या मुलीच्या वडिलांचे अस्थिविसर्जन विधिवत केलं. कोरोनामुळे मृत झालेल्या प्रेताला, मुलं, नातेवाईक, भाऊबंध, कोणीही हात लावण्यास, जवळ जाण्यास तयार नव्हते. तेव्हा मुस्लीम समाज प्रेताला स्मशानभूमीत नेऊन हिंदू जाती, धर्मानुसार दहन करीत होता.

बडा कब्रस्तानचे चेअरमन शोहेब खतीब. सर्वधर्मीयांसाठी कब्रस्तानची जागा उपलब्ध करून दिली. हिंदूंचा अंतिम संस्कार करताना आपला धर्म बाटतो असा विचारसुद्धा त्यांनी केला नाही. फक्त हिंदूंचीच नाही तर काही पारशी आणि ख्रिस्ती बांधवांच्या प्रेतांचीही त्यांनी त्यांच्या-त्यांच्या धर्मसंस्कारानुसार विल्हेवाट लावली.

बडा कब्रस्तानचे इक्बाल ममदानी सांगत होते की, आम्ही मुस्लीम प्रेतांचे दफन करीत होतो तेव्हा लक्षात आले की, शवागरात अनेक प्रेतं पडून आहेत. डॉक्टरांना विचारलं तर ते म्हणाले, ''ही हिंदूंची प्रेतं आहेत. कुणीच घ्यायला तयार नाहीत. महापालिकेचा स्टाफही कमी पडतोय. इतकी प्रेतं आहेत.''

ममदानींनी त्यांना विचारलं, ''आम्ही यांचे अंतिम संस्कार केले तर चालेल का? आम्ही त्यांच्या धार्मिक पद्धतीनं करू.''

डॉक्टर म्हणाले, ''याहून चांगली गोष्ट काय आहे. फक्त कायदेशीर परवानग्या काढू. नंतरच तुम्ही हे करा.''

त्यांनी सर्व परवानग्या मिळवून दिल्या. एप्रिल, मे, जून, जुलै आणि ऑगस्ट हे पाच महिने अव्याहतपणे ही टीम काम करत आहे. आजही काम चालू आहे. टीममध्ये सुरूवातीला सातजण होती. तीही वेगवेगळ्या क्षेत्रातील. बडा कब्रस्थानचे चेअरमन शोहेब खतीब, वरिष्ठ पत्रकार इक्बाल ममदानी,

उद्योजक शाबीर निर्बन, ॲड. इरफान शेख, उद्योजक सलिम पारेख, उद्योजक सोहेल शेख, सामाजिक कार्यकर्ते रफिक सुरतीया, आजही हे लोक याच कामात आहेत. या टीममध्ये आज दोनशे तरुण कार्यकर्ते सहभागी झाले आहेत.

काम सुरू केल्यानंतर यामध्ये अनेक अडचणी आल्या. ॲम्बुलन्स नव्हती, शववाहिनी नव्हती. कोविडग्रस्त व्यक्तीचे नातेवाईक येत नव्हते. तेव्हा ममदानी आणि खतीब यांनी नादुरुस्त पडून राहिलेल्या ॲम्बुलन्स शोधून काढून त्या दुरुस्त केल्या. सर्व खर्च त्यांनीच केला. या कामासाठी नंतर काही दानशूर व्यक्तींनी त्यांना मदत केली. पण नातेवाईकांकडून ते एक पैसाही घेत नाहीत. लॉकडाऊनच्या काळात आर्थिक संकटात असलेल्या व्यक्तींकडून पैसे घ्यावयाचे नाहीत हे ठरले आहे. बडा कब्रस्तानचे दोनशे कार्यकर्ते आपल्या जीवाची पर्वा न करता आणि आपल्या कुटुंबाची पर्वा न करता काम करीत आहेत.

पुणे : मूलनिवासी मंचची स्थापना पुण्यात झाली. या संस्थेचे प्रमुख अंजुम इनामदार आहेत. एप्रिल महिन्यात कोरोनामुळे एका मुस्लीम व्यक्तीचा मृत्यू झाला. त्यांचे प्रेत घरच्या व्यक्तीने ताब्यात घेण्यास नकार दिला. कारण, प्रेत ताब्यात घेतल्यास कुटुंबाला कोरोना होईल ही भीती होती. ती काही प्रमाणात बरोबरही होती. तेव्हा पुणे महानगरपालिकेच्या आयुक्तांनी सामाजिक कार्यकर्त्यांना, संस्था, संघटनांना प्रेताच्या दहनाचे कार्य करण्यास महानगरपालिकेला मदत करावी, असे आवाहन केले. तेव्हा अंजुम इनामदार व त्यांच्या सहकाऱ्यांनी आयुक्तांची भेट घेऊन प्रेत दहन, दफन करण्याचे ठरविले आणि त्यांना महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी कोरोनामुळे मृत्यू झालेल्या प्रेतांना कसे हाताळावे याचे प्रशिक्षण दिले. पी.पी.ई. कीट दिले, कायदेशीर बाबी कशा पूर्ण कराव्यात याचेही प्रशिक्षण दिले. कोणकोणत्या खबरदारी घ्याव्यात याची माहिती दिली. अशा प्रकारे मूलनिवासी मुस्लीम मंचचे कोविड योद्धे तयार झाले. अंजुम इनामदारांच्या नेतृत्वाखाली ५०० पेक्षा अधिक प्रेतांचे दहन केले. (ही पुस्तिका लिहीत असेपर्यंत ३०० त्याहीपेक्षा अधिक पुढे झाले आणि होत राहिले. संख्या वाढत आहे.) प्रेतांना त्यांच्या धर्मानुसार दहन, दफनाचे कार्य पार पाडीत आहेत. मूलनिवासी मुस्लीम मंचचा मुख्य उद्देश कोरोनाने मृत झालेल्या व्यक्तीचे मोफत दहन, दफन करणे, मोबदला-मानधन न घेणे, लोकांना मदत करणे. ख्रिस्ती, बौद्ध, लिंगायत, ब्राह्मण, मुस्लीम या सर्व धर्माच्या प्रेताचे त्यांनी दहन, दफन केले आहे. मूलनिवासी मुस्लीम मंच व ख्रिश्चन चॅरिटेबल ट्रस्ट एकत्रित कार्य करीत आहेत.

मूलनिवासी मुस्लीम मंच पुण्यातील महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या मनात असलेली भीती दूर करण्याचेही काम करीत आहे. महापालिकेलाही मदत होत आहे. कोरोनाने मृत्यू झालेल्या व्यक्तींचे ते सर्वस्व आहेत. लॉकडॉऊनच्या काळात प्रेत घेण्यास नातेवाईक, मुलं येत नाहीत अशा गंभीर परिस्थितीत महाराष्ट्रातील समाजसुधारक, संतांची व म.फुले, छ.शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा डोळ्यांसमोर ठेवून गेली सहा महिने ही संस्था रात्रंदिवस महानगरपालिकेच्या या कामात मदत करीत आहे. प्लेगच्या काळात सावित्रीबाई फुले यांनी जे कार्य केले तेही कार्य प्रेरणादायी आहे. याच काळात पुणे महानगरपालिकेत टेंडर प्रकरण सुरू झाले.

टेंडर प्रकरण : पुणे महानगरपालिकेने वृत्तपत्रात दहन-दफन करण्यासाठी जाहिरात दिली. दहन-दफन करणाऱ्या, मोफत सेवा देणाऱ्या संस्थांनी याची मागणी केली नाही. जीव धोक्यात घालून काम करणाऱ्या नि:स्वार्थी कार्यकर्त्यांना विमा योजना द्यावी किंवा काम करत असताना मरण पावल्यास नुकसान भरपाई द्यावी, त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींना महापालिकेत नोकरी द्यावी, किंवा इतर कोणतीच मागणी न करता सेवाभावी वृत्तीने मूलनिवासी मंच महापालिकेला मदत करीत आहे. अशा प्रसंगी पुणे महानगरपालिकेने सेवाभावी वृत्तीने, माणुसकीचे नाते जपण्याचे काम करणाऱ्या संस्थांना व सामाजिक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना संपविण्याचा घाट घातला. सामाजिक जाणिवेतून कोणीही काम करू नये, माणुसकी जपू नये, प्रत्येक कामात सौदेबाजी झालीच पाहिजे, कोरोनामुळे माणूस मेला तरी माणुसकी म्हणून त्याला मदत करू नका. पैसे घेऊनच काम करावे असा नीच विचार करून महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी, विद्वानांचे शहर असलेल्या पुणे महानगरपालिकेने कोरोना दहनाबाबत टेंडर काढले.

मूलनिवासी मुस्लीम मंचने दफन टेंडर पद्धत रद्द करा, या मागणीसाठी २१/८/२०२० रोजी पुणे महानगरपालिकेच्या मुख्य द्वारासमोर मूलनिवासी मुस्लीम मंचाचे अध्यक्ष अंजुम इनामदार व ख्रिश्चन चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष सगई नायर यांच्या मार्गदर्शनाखाली निदर्शने केली. या आंदोलनास अनेक सूज्ञ पुणेकरांनी पाठिंबा दिला. शेवटी टेंडर पद्धत रद्द करावी लागली. हा सामाजिक कार्यकर्त्यांचा विजय झाला. टेंडरच्या निमित्ताने मेलेल्या व्यक्तीच्या टाळूवरील लोणी खाणाऱ्याचा पराभव झाला. मूलनिवासी मुस्लीम मंच व त्यांच्या इतर संलग्न झालेल्या संस्था, व्यक्ती यांनी कोरोनाच्या प्रेताचे दहन करीत असताना टेंडर पद्धतीचेही दहन केले, याची नोंद इतिहासाला घ्यावीच

लागेल. अशा कठीण प्रसंगी सत्तेत असणाऱ्यांना हे कसे सुचते, याचा मानसशास्त्रीय अभ्यास करणे आवश्यक आहे. मूलनिवासी मुस्लीम मंचने 'सामाजिक संस्थांनी सामाजिक कार्य करीत असताना राजकीय सत्तेशी संघर्ष करण्याची तयारी ठेवावी' अशी भूमिकाही मांडली. निव्वळ सामाजिक कार्यातून प्रश्न सुटत नाही, प्रसंगी राजकीय भूमिका घ्यावीच लागते हे कोरोना भीषणकाळातही समोर आले.

मूलनिवासी मुस्लीम मंचच्या कार्यकर्त्यांना असे वाटते की, आपण जे काम करीत आहोत त्यातून आपल्याला पुण्य मिळेल. सवाब मिळेल. माणुसकीचे नाते जपता येईल, असे विचार घेऊन ते कार्य करीत आहेत. त्यांच्या कुटुंबाचा त्यांना पाठिंबा आहे. मंचने जेव्हा दहन, दफनच्या कार्यास सुरूवात केली, बातम्या येऊ लागल्या तेव्हा जवळचे मित्र त्यांना पाहिल्यानंतर बोलत नव्हते. असे कार्य करू नये, असा सल्ला देत होते, कुटुंबाची आठवण करून देत होते. मदत तर नव्हती, उपदेश होते. मंचचे कार्यकर्ते त्यांच्याकडे दुर्लक्ष करून सकारात्मक विचार करून लोकांना मदत करीत होते. प्रसंगी स्वत:च्या खिशातील पैसे खर्च करून काम करीत होते. असेच काम पुढेही करण्याचे ठरविले आहे. लॉकडाऊनमुळे कार्यकर्त्यांचीही परिस्थिती कठीणच आहे तरीही त्यांचा आत्मविश्वास आहे. भारत माझा देश आहे, भारतातील सर्वजण माझे बांधव आहेत या विश्वासाने मूलनिवासी मुस्लीम मंच व त्यांच्या सहकारी संस्था कार्य करीत आहेत. हिंदूंचे दहन केलेल्यांची काही उदाहरणे -

डॉ. प्रतिभा मोरेश्वर भोळे : मराठीतील सांस्कृतिक क्षेत्रात अत्यंत मानाचे स्थान असणाऱ्या ज्येष्ठ गायिका जोत्स्ना भोळे यांची नात प्रतिभा मोरेश्वर भोळे यांचे १ सप्टेंबर, २०२० रोजी दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे येथे अल्पशा आजाराने निधन झाले. त्या सुप्रसिद्ध अंध कवयित्री होत्या व अंधांसाठी त्यांनी भरीव कार्य केले. प्रतिभा भोळे अंध असल्यामुळे साहित्य क्षेत्रात स्थान मिळविण्यासाठी त्यांना फार मोठा संघर्ष करावा लागला. तसेच अंध व दिव्यांगनांसाठी काम करणारी स्वयंसेविका म्हणून त्या सर्वपरिचित होत्या. त्यांच्या कार्याची दखल घेऊन शासकीय व खाजगी संस्थांमार्फत अनेक पुरस्कार प्रदान केले होते. त्यांचा मित्रपरिवार मोठा होता आणि नातेवाईकांचा गोतावळा मोठा होता. परंतु अखेरच्या क्षणी, त्यांच्या पतीशिवाय त्यांच्याजवळ कोणीच नव्हते.

प्रतिभा भोळेंच्या मृत्यूनंतर अंतिम संस्कार करण्यासाठी जवळचे मित्र, नातेवाईक कोरोनामुळे येण्यास तयार नव्हते. प्रतिभा भोळे यांचे पती सुनिल

परमार यांनी मूलनिवासी मुस्लीम मंचच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधला. अवघ्या २० मिनिटात कार्यकर्ते मदतीसाठी पोहोचले. प्रेतासंबंधी आवश्यक ती कागदपत्रे पूर्ण करून, प्रेत दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलकडून आपल्या ताब्यात घेतले. पतीला सोबत घेऊन पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमीत हिंदू रीतीरिवाजाप्रमाणे अंत्यसंस्कार केले.

'डॉ. प्रतिभा भोळे यांचा अंत्यसंस्कार आमच्या हातून होणे हे आमच्यासाठी भाग्याचे लक्षण आहे असे आम्ही मानतो', असे मूलनिवासी मुस्लीम मंचचे अध्यक्ष अंजुम इनामदार व त्यांचे सहकारी साबीर शेख तोपखाना, जमीर मोमीन, मौलना शकिल शेख, साबीर सय्यद, दानिश खान, अमजद शेख यांनी व्यक्त केले.

अंत्यविधीनंतर मदतीचा हात : पुणे जिल्ह्यातील दौंड येथे राहणाऱ्या ६५ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाचा पिंपरीतील वाय.सी.एम. रुग्णालयात कोरोनामुळे मृत्यू झाला. हे कळताच त्यांची दोन मुले पिंपरीत दाखल झाली. त्यांचे कुणीच नातेवाईक पिंपरी-चिंचवड, पुणे येथे नव्हते. त्यांच्या वडिलांचे अंत्यसंस्कार कोठे करावेत हा प्रश्न त्यांच्यापुढे होता. ओळखीचेही कुणी नव्हते. मृतदेह दौंड येथे घेऊन जाण्यास पैसे नव्हते. तेव्हा रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी सामाजिक कार्यकर्त्यांचा संपर्क करून दिला. तेव्हा अन्वर पानसरे, रफिक कुरेशी, मेहबूब शेख, मौलना नय्यर, अंजुम इनामदार रुग्णालयात हजर झाले आणि निगडीतील सेक्टर क्रमांक बारामध्ये अंत्यविधी केला. त्या दोघा भावांकडे परत दौंडला जाण्यासाठी पैसे नव्हते तेव्हा दौंड येथील नगरसेवक बादशहा शेख यांनी तत्काळ मोटार पाठवून त्यांना दौंडला सोडले. अशी अनेक उदाहरणे आहेत.

हिंदू, मुस्लीम व ख्रिस्ती धर्माच्या कोरोनाबाधित व्यक्तींवर अंत्यविधी करण्यास पिंपरी-चिंचवड येथील अनेक मुस्लीम संघटना पुढे आल्या आहेत. त्याची दखल घेऊन पालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी शहरातील सामाजिक संस्थांना काही अटींवर अंत्यविधी करण्यास परवानगी दिली आहे. कारण हा विषय अत्यंत संवेदनशील आहे. त्या संस्था, संघटनांची काही नावे पुढीलप्रमाणे : पिंपरी-चिंचवड-मुस्लीम सुरक्षा संघटना, जन्नतुलबकी वेल्फेअर ट्रस्ट, कुल जमात तंजिम या संस्थांना पालिकेने परवानगी दिली.

पुण्यातील महर्षीनगर डायस प्लॉट झोपडपट्टीत नामदेव पांडुरंग कांबळे, वय ८० वर्षे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. परंतु कोरोनामुळे निधन झाले असे गृहीत धरून त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी कोणीही पुढे येत नव्हते. दुपारी

चार वाजता झालेला मृत्यू. रात्रीचे दहा वाजेपर्यंत मृतदेह घरातच होता. स्थानिक कार्यकर्त्यांना सोबत घेऊन मूलनिवासी मुस्लीम मंचच्या कार्यकर्त्यांनी रात्री उशिरा घोबाघाट स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले.

मृत्यू कोरोनामुळे झाल्याची अफवा, मृतदेह गावात आणण्यास विरोध, ही घटना पुणे शहरापासून जवळ असलेल्या केडगाव येथे घडली. केडगाव येथील रहिवाशी अब्दुल शेख यांची प्रकृती बिघडली. लॉकडाऊनमुळे गावात उपचार होत नव्हते व पुण्यास नेता येत नव्हते. अशाही परिस्थितीत गावातील एका सामाजिक कार्यकर्त्यांने रुग्णवाहिका करून पुण्याच्या ससून रुग्णालयात पाठविले. त्यांच्यासोबत त्यांच्या दोन अल्पवयीन मुली होत्या. रुग्णवाहिकेत रूखसान, वय १३ आणि तनुजा, वय १५ या दोघी, ड्रायव्हर व आजारी वडील असे चौघेच होते. दुसऱ्याच दिवशी वडिलांचे निधन झाले. ते कोरोनामुळे निधन पावल्याची अफवा गावात पसरली आणि मृतदेह आणण्यास गावाचा विरोध होता. त्यामुळे गांगरलेल्या मुलींना मृतदेहाचे काय करावयाचे हा प्रश्न निर्माण झाला. सोबत कोणीही नातेवाईक, मित्रमंडळी नाहीत. शेवटी केडगावचे तलाठी सचिन काळे आणि मूलनिवासी मुस्लीम मंचचे कार्यकर्ते अंजुम इनामदार मदतीला पुढे आले. मयत रहिम अब्दुलशेख यांच्या पत्नीची परवानगी घेऊन मंचच्या कार्यकर्त्यांनीच पुण्यातील रहमतबाग कब्रस्तानात त्यांचा दफनविधी केला. तलाठी सचिन काळे यांनी आपल्या घरी या दोन मुलींना ठेवून घेऊन दुसऱ्या दिवशी केडगावला स्वत: पोहोचविले. दफनाच्या दुसऱ्या दिवशी मयत रहिम अब्दुलशेख यांची कोरोना चाचणी निगेटिव्ह आली. पोस्टमार्टम अहवालात किडनी निकामी होऊन हृदयविकाराचा झटका आल्याचे निदान झाले. तोपर्यंत या कुटुंबाला गावात प्रचंड मनस्ताप व तणावाखाली जगावे लागले याची कल्पना करून पाहा.

क्वारंटाइनसाठी मस्जिदचे हॉल प्रदान

वडगाव मावळ येथील जामा मस्जिदच्या मुस्लिमांनी बकरी ईदचे औचित्य साधून क्वारंटाइनसाठी मस्जिदचा हॉल दिला. यावर्षी बकरी ईद साधेपणाने साजरी केली. कोरोनाच्या संकटात सामाजिक हितासाठी कार्य करावे या भावनेतून येथील कार्यकर्त्यांनी क्वारंटाइन सेंटरसाठी सर्व सोयींनीयुक्त शंभर बेडचे दोन हॉल शासनाकडे सोपविण्याचा ठराव करून त्याच्या प्रती तत्काळ शासनाकडे दिल्या.

लोणावळा : कोरोनाच्या काळात, कोरोना रुग्णांवर अंत्यसंस्कार करण्यासाठी रक्ताच्या नात्यातील माणूस पुढे येत नसताना जात, धर्म या पलीकडे जाऊन

मानवता धर्माचे पालन करत लोणावळ्यातील सुन्नी मुस्लीम जमातने सर्वधर्मीयांचे त्यांच्या त्यांच्या धर्मांच्या रीतीरिवाज, नियमाप्रमाणे अंत्यसंस्कार करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. लोणावळा नगरपरिषदेने त्यांना मान्यता दिली.

कोरोना शहरी भागातून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात पसरला आहे. पुणे जिल्ह्यातून मावळ तालुक्यातील लोणावळा येथेही कोरोनाची लागण झाली आहे. अनेकांचे मृत्यू होत आहेत. प्रशासन, विविध सामाजिक संस्था आपआपल्या कुवतीप्रमाणे कार्य करीत आहेत. त्यातूनच प्रेरणा घेऊन लोणावळ्यातील सुन्नी मुस्लीम जमात आणि लोणावळा नगरपरिषदेने संयुक्तरित्या कोरोनाने मृत पावलेल्या व्यक्तींचे अंतिम संस्कार करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. यांचे कार्यक्षेत्र फक्त लोणावळा शहरापुरते मर्यादित न ठेवता संपूर्ण मावळ तालुक्यात हा उपक्रम राबविणार आहेत.

कोरोना संकटकाळात लॉकडाऊनमध्ये सुन्नी मुस्लीम जमात व फरान हनिफ शेख ट्रस्टने वस्तू वाटपाचे काम केले आहे.

लोणावळा येथील एका हिंदू व्यक्तीचा कोरोनामुळे मृत्यू झाला तेव्हा, प्रेताचे दहन वैकुंठभूमी वरसोली येथे या संघटनेने केले. हिंदू कोरोना रुग्णावर अंत्यविधी करण्याची ही चळवळ ग्रामीण भागात पोहचल्याचे दिसून येत आहे.

पुण्यातील मुस्लीम सत्यशोधक मंडळाने बकरी ईदच्या निमित्ताने १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट दरम्यान कोरोनाग्रस्तांसाठी रक्तदान व प्लाझ्मादान शिबिर आयोजित केले होते.

कोल्हापूर : राजर्षी छत्रपती शाहूंच्या संस्काराचा वारसा लाभलेल्या कोल्हापुरात जाती-धर्माची भिंत कधीच ढासळली आहे हे यापूर्वीच अनेक उदाहरणांतून कोल्हापूरकरांनी दाखवून दिले आहे. कोरोनाच्या संकटकाळात कोरोनाबाधित मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्याची नातेवाईकांना परवानगी नाही, शासकीय यंत्रणा आहे. पण अनेकदा यंत्रणा तोकडी पडते. कोरोनामुळे मृत्यूचे प्रमाण वाढत आहे. अशा प्रसंगी सुरुवातीपासूनच बैतुलमाल कमिटीने अंत्यसंस्काराची जबाबदारी स्वीकारली आहे.

कोल्हापूर शहराच्या मुस्लीम बोर्डिंगमध्ये बारा वर्षांपूर्वी बैतुलमाल कमिटीची स्थापना झाली. मुस्लीम समाजाकडून जकातीचे जे पैसे जमा होतात, त्यातून बैतुलमाल कमिटीचा व्यवहार चालतो. अन्नधान्याचे वाटप, आजारी लोकांना औषधाचे वाटप इ.

'तुम जमीनवाले पर रहम करो,
आसमानवाला तुमपर रहम करेगा'

हे तत्त्व बैतुलमाल कमिटीचे आहे. साठ वृद्ध हिंदू-मुस्लीम कुटुंबांची ते देखभाल करतात. हे कार्य शेवटपर्यंत करणार आहेत. बैतुलमाल कमिटीचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे कोल्हापूरचा शासकीय दवाखाना म्हणजे सी.पी.आर. मधील एक हॉल त्यांनी कोविड-१९ साठी आय.सी.यू. करून दिला. त्याचा खर्च ३० लाख रुपये आहे. तसेच इचलकरंजी येथील मुस्लीम बांधवांनी आय.जी.एम. दवाखान्यात एक आ.सी.यू. हॉल तयार करून दिला. त्याचाही खर्च ३० लाख रुपये आहे.

बैतुलमाल कमिटीच्या सदस्यांनी कोरोनाकाळात प्रेतांचे दहन करण्याचे कार्य हाती घेतले. या कार्यात त्यांना कोल्हापूर महानगरपालिका, प्रांत अधिकारी, जिल्हाधिकारी, पोलीस प्रशासनाची सक्रिय मदत आहे. हिंदूंच्या प्रेताचे दहन हिंदू पद्धतीने पंचगंगा स्मशानभूमीत करतात. हा लेख लिहीपर्यंत त्यांनी एकशे पन्नास मृत व्यक्तींचे दहन केले आहे. त्यासाठी त्यांच्याकडे तरुणांची एक टीम आहे. या दहनाबाबत जाफरबाबा म्हणतात, "आम्ही जेव्हा मृत व्यक्तीचे दहन करण्यास स्मशानात जातो तेव्हा मृत व्यक्तीचे नातेवाईक बहुतेकवेळा हजर असतात. आमचे कार्यकर्ते शासकीय नियमांचे पालन करत पी.पी.ई. कीट घालून दहन करतात. त्यानंतर नातेवाईक भेटण्यासाठी येतात, ते आमच्या पाया पडतात, मदत केल्याबद्दल आभार व्यक्त करतात. आपण नसता तर प्रेताचे काय झाले असते? आम्हाला किती त्रास झाला असता? असे प्रश्न उपस्थित करून उपकाराची परतफेड कशी करू असेही म्हणतात. ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे ते पांढरे कापड, पी.पी.ई. कीट भेट म्हणून आणून देतात."

जाफरबाबा म्हणतात, "या दहनविधीमुळे हिंदू-मुस्लीम भाईचारा वाढला आहे. एकमेकांबद्दलचे गैरसमज दूर झाले आहेत. आम्ही इतकी जोखीम घेऊन काम करतोय याचे त्यांना आश्चर्य वाटते. तोंडभरून आमचे कौतुक करतात. आमच्या कुटुंबाबद्दल चौकशी करून काळजी घेण्यास सांगतात. अनेक सामाजिक संघटना आमचे सत्कार करीत आहेत. हिंदू समाजाचा आमच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत आहे याची आम्हालाही जाणीव होते." अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

कोल्हापूरच्या बैतुलमाल कमिटीचा आदर्श कर्नाटकातील विजापूर, बेळगाव, निपाणी ही शहरे घेत आहेत. तेथे अशा प्रकारचे कार्य चालू आहे. तसेच

पश्चिम महाराष्ट्रात बैतुलमाल कमिटी आदर्श बनल्याने त्याचे अनुकरण अनेक जिल्ह्यात होत आहे. त्यांनी केलेल्या कार्याचे एक उदाहरण.

कोल्हापूर शहरातील शिवाजी पेठ परिसरातील विष्णूपंत मोघे या ८४ वर्षाच्या वृद्धाचा कोरोनामुळे मृत्यू झाला. घरात फक्त दोघेच असतात. मृतदेह घेऊन जाण्याची कोणतीही सोय नव्हती. तेव्हा त्यांच्या एका नातेवाईकाने मदतीची बातमी कोल्हापूर मीडिया या व्हॉटस्अप ग्रुपवर टाकली. या ग्रुपमधील एकाने बैतुलमाल कमिटीच्या सदस्यांना माहिती दिली आणि बैतुलमाल कमिटीचे कार्यकर्ते तत्काळ हजर होऊन मृतदेहाची हिंदू पद्धतीने बांधणी करून पंचगंगा नदीवरील स्मशानभूमीत दहन केले.

कोल्हापुरात एका मुस्लीम व्यक्तीचे निधन झाले. रुग्णवाहिका न मिळाल्यामुळे मृत्यूदेह दफनभूमीत न्यायला उशीर होत होता. जमलेले लोक कोरोनाच्या काळात रुग्णवाहिका मिळणे कठीण आहे, अशी कुजबूज करू लागले. बैतुलमाल कमिटीकडे रुग्णवाहिका असती तर मृतदेहांची हेळसांड होणार नाही, असे मत मांडू लागले. त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या आझाद नायकवाडीचे संवेदनशील मन अस्वस्थ झाले. आझादने कोणताही विचार न करता तेथे असलेल्या बैतुलमाल कमिटीच्या सदस्यांना, "माझी मारुती व्हॅन, बैतुलमाल कमिटीला रुग्णवाहिकेत रूपांतरित करून देतो, गाडी दान करतो" असे सांगितले. आझादने घरी येऊन मारुती व्हॅन व त्याची सर्व कागदपत्रे बैतुलमाल कमिटीकडे सोपविली.

मारुती व्हॅनचे अद्यावत रुग्णवाहिकेत रूपांतरित झाल्यानंतर, महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते १५ ऑगस्ट, २०२० रोजी बैतुलमाल कमिटीकडे सुपुर्द करण्यात आली.

आझाद हा कोल्हापूरच्या एका माध्यमिक शाळेत शिक्षक आहे. त्याची पत्नी तासिका तत्त्वावर प्राध्यापिका आहे. आई-वडील निवृत्त शिक्षक आहेत. आझाद आपली नोकरी सांभाळत महाराष्ट्रभर छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज व इतर सर्व राष्ट्रपुरुष व समाजसुधारकांच्या कार्याचे पोवाडे/शाहिरीचे कार्यक्रम करण्यासाठी मारुती व्हॅन वापरत होता.

कोल्हापूर जिल्ह्यातील कोरोनाने मृत्यू झालेल्या देहाला आईवडील, मुले-पत्नी, हात लावत नाहीत. त्या मृतदेहावर मानवतेच्या दृष्टिकोनातून मृत व्यक्तीच्या धर्माप्रमाणे अंत्यसंस्कार करणाऱ्या सेवाभावी बैतुलमाल कमिटीला गाडी देण्याचा आनंद वेगळाच होता.

कोल्हापुरातील 'माऊली केअर सेंटर' ही संस्था वृद्धाश्रमही चालविते.

कोरोनाच्या काळात प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी प्रत्येक वृद्धास किमान अर्धा लिटर दुधाची गरज आहे, हे लक्षात येताच आझादने चाळीस लोकांना एकत्रित करून, 'माणुसकी मंच'ची स्थापना केली. मंचच्या प्रत्येक सदस्याने ते स्वत: जिवंत असेपर्यंत प्रत्येकजणांनी रोज अर्धा लिटर दूध द्यावे. म्हणजेच दररोज वीस लिटर दूध संस्थेला देण्याचा शुभारंभ १५ ऑगस्टपासून सुरू केला.

बैतुलमाल कमिटी लॉकडाऊनच्या काळात हजारो गरीब, वंचित व गरजू लोकांना भोजन व अन्नधान्याचे कीट पुरवित आहे.

जयसिंगपूर : कोल्हापूर जिल्ह्यातील जयसिंगपूर नगरपालिकेचे आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांसाठी कोरोना पॉझिटिव्ह असलेल्या मृत लोकांचे दहन करणे अत्यंत जोखमीचे काम होते. मृत पॉझिटिव्हची संख्या वाढत होती तसे कर्मचाऱ्यांवर कामाचा ताणही वाढत होता. ताण वाढल्यामुळे कर्मचारी आजारी पडू लागले. अशा प्रसंगी मृत व्यक्तींवर अंत्यसंस्कार करणे अवघड झाले. कोरोनाने मृत झालेल्यांचे दहन कोण करेल, हा नगरपालिकेपुढे प्रश्न उभा राहिला.

अशा प्रसंगी जयसिंगपूर शहरातील काही मुस्लीम युवक पुढे आले आणि त्यांनी ती जबाबदारी स्वीकारली. सुरूवातीस मृत्यू पावलेल्या मुस्लीम व्यक्तींचे दफन करू लागले. इतर धर्मियांचे काय, हा प्रश्न निर्माण झाला. त्यांनी तीही जबाबदारी स्वीकारली. इतर धर्मियांचे दहन, दफन ही जबाबदारी संवेदनशील व कठीण वाटत होती. आपल्या हातून नकळत चूक झाल्यास, धार्मिक भावना दुखावल्यास सामाजिक तणाव वाढेल अशी भीती वाटत होती. कारण मृत व्यक्ती कोरोना संशयित जरी असला तरी त्याचे नातेवाईक जवळ येण्यास तयार नव्हते.

अशा कठीण परिस्थितीत मुस्लीम युवक जीवाची पर्वा न करता हिंदूंच्या प्रेताचे दहन करण्याचे काम करू लागले. त्यासाठी हिंदूंच्या रीतीरिवाजांचे पालन करू लागले. पॉझिटिव्ह रुग्ण रुग्णालयामध्ये मृत्यू होऊ दे किंवा घरी; हे युवक पी.पी.ई. कीट घालून तेथे पोहोचू लागले. मृतदेह पॅक करणे, शववाहिनीतून स्मशानात घेऊन जाणे व त्या ठिकाणी हिंदूंच्या नियमाप्रमाणे विधी पार पाडून दहन किंवा दफन करू लागले. ही सर्व कामे पंधरा मंडळींचा ग्रुप पार पाडू लागला. त्यासाठी ते कोणताही मोबदला घेत नाहीत.

उदगांव : कोल्हापूर जिल्ह्यातून सांगलीत प्रवेश करताना अंकली पुलाला लागून उदगांव गावाची वैकुंठधाम स्मशानभूमी आहे. तेथे रेहमान फाऊंडेशन व चांदतारा मोहल्ला मस्जिद कमिटीचे सहा ते सात कार्यकर्ते गेल्या चार

महिन्यांपासून अहोरात्र कोरोनामुळे मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या धर्माच्या चालीरितीनुसार अंत्यसंस्कार करीत आहेत. त्याबद्दल कोणताही मोबदला स्वीकारत नाहीत. समाजाचे ऋण फेडणे हेच आमचे कर्तव्य आहे, असे ते मानतात. हेही कोरोना योद्धे आहेत ते विसरून चालणार नाही.

सांगली जिल्हा : सांगली, मिरज, कुपवाड महानगरपालिकेतील एका आरोग्य कर्मचाऱ्याचा कोरोना संसर्गामुळे मृत्यू झाल्याने महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी कामावर बहिष्कार टाकला होता. याच काळात कोरोनामुळे मृत्यू झालेल्या एका हिंदू व्यक्तीच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यासाठी महानगरपालिकेने आवाहन केले. तेव्हा ही जबाबदारी 'जमियात उलेमा ए हिंद आणि मदनी चॅरिटेबल ट्रस्ट'च्या कार्यकर्त्यांनी स्वीकारली आणि ती हिंदू पद्धतीने पार पाडली. याला म्हणतात सामाजिक बांधिलकी. क्षुल्लक गोष्टीवरून धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या लोकांच्या डोळ्यात या घटनेने अंजन घातले.

जातीधर्माच्या पलीकडे जाऊन अंत्यसंस्कार करणाऱ्या मुस्लीम बांधवांचे मृतांच्या नातेवाईकांनी अश्रूच्या डोळ्यांनी आभार मानले. हिंदू बांधव हे आपले मोठे भाऊ आहेत. भावाने भावाला संकटकाळी मदत केली पाहिजे, हे आपले कर्तव्यच आहे. आम्ही आमचे कर्तव्य पार पाडले अशी भावना जमियात उलमा-ए-हिंद व मदनी चॅरिटेबल ट्रस्टच्या सदस्यांनी व्यक्त केली. या क्षणापर्यंत म्हणजे हे लेखन करेपर्यंत या संघटनांनी विविध जाती-धर्मातील नव्वद मृतदेहांवर अंत्यसंस्कार केले आहेत.

सांगलीच्या रतननगरमध्ये राहणाऱ्या गुजराती समाजातील हळद व्यापाऱ्याचा कोरोनामुळे सांगलीच्या मेहता हॉस्पिटलमध्ये मृत्यू झाला. त्यांचे नातेवाईक होम क्वारंटाईनमध्ये असल्याने अंत्यसंस्कारास उपस्थित राहू शकत नव्हते. त्यांच्याच एका नातेवाईकाने मदनी चॅरिटेबल ट्रस्ट आणि जमियात उलेमा-ए-हिंदच्या कार्यकर्त्यांना फोन करून परिस्थिती सांगितली तेव्हा या संघटनेचे कार्यकर्त्यानी प्रेताला हिंदू पद्धतीने अग्नी दिला. त्यांच्या नातेवाईकानी या दोन्ही संघटनांचे जाहीर आभार मानले.

जमियात उलेमा-ए-हिंद व मदनी चॅरिटेबल ट्रस्ट या कामासाठी कोणत्याही आर्थिक मोबदला स्वीकारत नाहीत. उलट एखाद्या मृत्यू पावलेल्या व्यक्तीचे प्रेत आणताना आर्थिक अडचण निर्माण झाल्यास ते स्वत: ती अडचण सोडवितात.

अकोला : २३ मे २०२०, अकोला येथील श्रावणी भागातील एका ज्येष्ठ नागरिकाचा जिल्हा रुग्णालयात कोरोना उपचारादरम्यान मृत्यू झाला.

त्यांच्या मृत्यूनंतर रुग्णालय आणि महानगरपालिका प्रशासनाने त्यांचे कुटुंबीय आणि नातेवाईकांना 'मृतदेह स्मशानभूमीत घेऊन जाणार आहोत आपल्यापैकी कोणीतरी यावे', असा निरोप दिला. परंतु चोवीस तास वाट पाहूनही त्यांच्यापैकी कोणीही मृतदेह स्वीकारण्यास पुढे आले नाहीत. त्यामुळे प्रशासनाची चिंता वाढली. प्रशासनापुढे गंभीर समस्या निर्माण झाली. तेव्हा मानवतेच्या भूमिकेतून मदतीसाठी अकोल्यातील 'कच्छी-मेमन जमात ट्रस्ट'चे अध्यक्ष जावेद जकारिया व त्यांचे कार्यकर्ते प्रशासनाच्या मदतीला धावून आले.

कच्छी मेमन जमातच्या कार्यकर्त्यांनी मोहता मिल स्मशानभूमीत अंत्यसंस्काराची तयारी सुरू केली. महानगरपालिकेचे स्वच्छता अधिकारी या कामात त्यांना मदत करीत होते. हिंदू धर्मातील रीतीरिवाजानुसार सर्व तयारी झाली. शेवटी चितेला अग्नी देण्यासाठी नातेवाईक आले नाहीत. तेव्हा वसीम खान, समीर खान या कार्यकर्त्यांनी अग्नी दिला. जिथं स्वत:च्या रक्ताच्या नात्यांनी नाकारलं, तिथे माणुसकीच्या नात्याने त्याचा अंतिम प्रवास इतरांनी सुकर केला.

अकोल्यात मृत पावलेल्या कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांवर प्रत्येक धर्माच्या पद्धतीनुसार अंतिम संस्कार करण्यासाठी अकोला कच्छी मेमन जमातीच्या वतीने १० कार्यकर्त्यांची एक टीम बनविण्यात आली आहे. यातील पाच जणांची एक टीम दिवसा काम करते तर दुसरी पाच जणांची टीम रात्री काम करते. मृत व्यक्तीच्या कुटुंबांना त्यांची इच्छा असेल तर दफनभूमीत/स्मशानभूमीत घेऊन येतात. त्यांच्या देखत त्यांच्या धर्माचे रीतीरिवाज पाळून विधी करूनच दफन/दहन केले जाते. यासाठी प्रशासनाचे सहकार्यही घेतले जाते.

या कार्यामुळे अकोला शहरात प्रथम हिंदू-मुस्लीम ऐक्याचे वातावरण दिसून येत आहे. सर्व जाती-धर्मांचे लोक कच्छी मेमनच्या कार्याला सर्व प्रकारची मदत करीत आहेत. कच्छी मेमन समाजाने दोन रुग्णवाहिका उपलब्ध करून दिल्या आहेत. ही पुस्तिका लिहीत आहे तोपर्यंत सर्वधर्मीयांचे एकशे पन्नासपेक्षा अधिक कोरोना पॉझिटिव्ह मृत व्यक्तींचे दहन/दफन केले आहे.

कच्छी-मेमन जमातीचे अध्यक्ष जावेद जकारिया हे पत्रकार व बांधकाम व्यावसाईक आहेत. हे उत्तम संघटक आहेत. प्रेतांचे दहन/दफन करणे एवढेच कार्य नाही तर लॉकडाऊनच्या काळात हजारो गरिबांना अन्नधान्याचे कीट वाटप केले आहे.

एका कोरोना पॉझिटिव्ह व्यक्तीचा अकोला शहरातील सरकारी रुग्णालयात मृत्यू झाला. त्यांच्या नातेवाईकांनी कच्छी मेमन जमातच्या कार्यकर्त्यांना सांगितले

की, आम्ही महानुभव पंथी असल्याने मृत व्यक्तीचे दफन करावे. त्यानुसारच मोहता मिल स्मशानात त्यांचे धार्मिक विधी करून दफन करण्यात झाले. कच्छी मेमन-जमातीचे असे धर्मनिरपेक्ष कार्य चालू आहे.

अकोला शहरातील एका घरात पती-पत्नी दोघेच राहत होते. पत्नीला कोविडची लक्षणे दिसल्याने तिला ॲडमिट करण्यात आले. पत्नी ॲडमिट झाल्यामुळे पतीचा ताण वाढला, त्यांना घरीच हृदयविकाराचा झटका आल्यामुळे मृत्यू झाला. नागपूर येथे राहणाऱ्या मुलांनी अकोला येथे येऊन वडिलांचे प्रेत ताब्यात घेऊन अंत्यसंस्कार करण्यास नकार दिला. तेव्हा कच्छी मेमन जमात संघटनेला प्रशासनाने संपर्क केला आणि अंत्यसंस्कार करण्याची जबाबदारी सोपविली. मुस्लीम व्यक्तीने प्रेताला अग्नी दिला. दुसऱ्या दिवशी मृत व्यक्तीच्या पत्नीचा कोविड रिपोर्ट निगेटिव्ह आला.

नागपूर : नागपूर शहरामध्ये एक वेगळेच दृश्य दिसून गेले. येथे हिंदू-मुस्लीम सर्व मतभेद विसरून हिंदू मुस्लिमांच्या प्रेताचे दफन करण्यास मदत करीत आहेत तर मुस्लीम हिंदूंच्या प्रेतांच्या दहनासाठी मदत करीत आहेत. हीच भारतीय एकात्मता आहे.

नागपूर येथील जमिअत् उलेमा-ए-हिंद या संघटनेने ही पुस्तिका लिहीपर्यंत हिंदूंच्या कामठी स्मशानभूमीत कोरोनाने मृत्यू पावलेल्या एकोणचाळीस हिंदूंचे दहन केले आहे.

जमिअतचे स्वयंसेवक वैयक्तिक सर्व सुरक्षा म्हणजे पी.पी.ई. कीट वापरून मृतदेह घेऊन जातात. मृतदेहासोबत मृताचा नातेवाईक आल्यास त्यांना सोबत घेऊन त्यांच्या हस्ते अग्नी देतात, जर नातेवाईक नसतील तर स्वतः अग्नी देतात. त्यावेळी हिंदूंचे सर्व रीतीरिवाज पाळतात.

नागपुरातील जमिअत् ही मुस्लीम मौलवींची जुनी संस्था आहे. जमिअतला या कामात इतर दोन संस्था मदत करीत आहेत. एक मुस्लीम फाऊंडेशन, दोन सफा बैतुलमाल कमिटी.

जमिअत्, मुस्लीम फाऊंडेशन, सफा बैतुलमाल कमिटी यांनी कोरोनाच्या पहिल्या टप्प्यापासूनच कामाला सुरूवात केली. कोरोनामुळे मृत्यू झालेल्या मुस्लीम व्यक्तींचे या संघटनेमार्फत दफन केले जात होते. एके दिवशी एका स्थानिक नेत्याकडून एका हिंदू कुटुंबातील मृत व्यक्तीला मदत करावी अशी विनंती आली. तेव्हा आम्ही सर्वांनी एकत्रित चर्चा केली आणि हिंदूंच्या प्रेतांनाही दहन करण्यासाठी मदत करण्याचे ठरविले, असे मुस्लीम फाऊंडेशनचे इस्लाउद्दीन अन्सारी म्हणाले.

नागपूरमध्ये कोरोनामुळे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे अंतिम संस्कार महानगरपालिकेद्वारे केले जात होते. पण कामठी स्मशानभूमीत अग्नी देताना सुरक्षिततेच्या कारणाने नातेवाईकांना हजर राहण्याची परवानगी दिली जात नव्हती. त्यामुळे नातलग नाराज होते. तेव्हा जमिअत्ने त्यात हस्तक्षेप करून नातेवाईकांना सुरक्षिततेची सर्व साधने पुरवून अंतिम संस्कारास जाण्याची सोय केली. अशा पद्धतीने हिंदूंसाठी या तीन संघटना कार्य करू लागल्या. नागपूर शहरातील धार्मिक सलोख्याचे हे उत्तम उदाहरण आहे.

जमिअतला अनेक हिंदूंनी निरनिराळ्या कारणांमुळे मदत करण्याची विनंती केली आणि ती त्यांनी तत्परतेने मान्य केली. हे नागपूर शहरातील धार्मिक एकतेचे उत्तम उदाहरण आहे.

नागपुरातील सर्वच राजकीय पक्षाचे नेते, कार्यकर्ते त्यांच्या कार्याचे कौतुक करीत आहेत. कामठी नगरपरिषदेचे भाजपचे माजी सदस्य यांनी जमिअत् व त्यांच्यासोबत कार्य करणारे मुस्लीम फाऊंडेशन व बैतुलमाल कमिटीचे सदस्य हे कोरोना योद्धे आहेत. परिस्थिती सामान्य झाल्यावर आम्ही त्यांचा जाहीर सन्मान करण्यासाठी योजना आखत आहोत असे त्यांनी सांगितले.

लॉकडाऊन सुरू झाल्यानंतर संघटनेने अन्नपॅकेटस् वाटप सुरू केले. कोरोनाचे रुग्ण वाढताच सफा बैतुलमाल कमिटीने रुग्णवाहिका विनामूल्य उपलब्ध करून दिली.

हिंदू कार्यकर्त्यांनी आजपर्यंत मुस्लीम मृतदेहांना दफन करण्यात मदत केली आहे.

'संकटाच्यावेळी मदत करणे हेच महान कार्य आहे. तो कोणत्याही धर्माचा असो, हे आमचे तत्त्व आहे' या भूमिकेतून मुस्लीम संघटना कार्य करीत आहेत.

धुळे : "बिमारी तो आती-जाती रहेगी
इन्सानियत जिंदा रहनी चाहिए"

धुळे शहरातील पेठ भागातील गल्ली क्रमांक सातमधील वृद्ध महिलेचा कोरोनामुळे मृत्यू झाला. मरणोत्तर तपासणीनंतर तिचा अहवाल पॉझिटिव्ह आला. तेव्हा नातेवाईक, मित्रपरिवार भीतीमुळे अंत्यसंस्कारास येत नव्हते. मृत्यू झालेल्या महिलेचा एकच मुलगा, तो या प्रसंगाने हतबल झालेला. शेवटी वर्षानुवर्षे गल्लीत राहणारे मुस्लीम तरुण पुढे आले. ज्या गल्लीत आम्ही राहतो, त्याच गल्लीतील महिला आम्हाला मुलं, भाऊ मानतात. आम्हाला राखी बांधतात. रमजान ईदला आमच्याकडे येतात. या शेजारधर्माच्या

नात्याने आम्ही त्यांना मदत केली. ‘बिमारी तो आतीजाती रहेगी, इन्सानियत जिंदा रहनी चाहिए’, अशी मुस्लीम समाजाची भावना आहे. सिव्हिल हॉस्पिटलमधून मृतदेह उचलण्यापासून ते अंत्यसंस्कारापर्यंत त्यांनी मुलाला मदत केली.

रमजानचा पवित्र महिना सुरू होता. ‘रोजा’ सोडण्याची वेळ जवळ आली असताना मृत्यूची घटना घडली आणि कार्यकर्ते थेट हॉस्पिटलकडे धावले, बाधित वृद्धांची अंत्यसंस्काराची प्रक्रिया पूर्ण करून, घरी न जाता स्नान केले. सॅनिटायझेशनची खबरदारी घेतली आणि घरी गेले. नमाज पठणानंतर रात्री रोजा सोडला. ‘हमने नेक काम किया.. उपरवाले का शुक्रिया’ अशी भावना व्यक्त केली.

नांदेड : रक्ताच्या पलीकडील नाते : नांदेड शहरामधील खडकपुरा येथे दर्गाह दुल्हाशाह रहमान व मस्जिदीच्या दफनभूमीत ‘हप्पीक्लब चॅरिटेबल ट्रस्ट’ मुस्लीम तरुणांमार्फत विधिवत हिंदूंच्या कोरोनाच्या प्रेतांचे अंत्यसंस्कार करीत आहेत तर मुस्लीम प्रेतांचे दफन करीत आहेत. नांदेड महानगरपालिकेच्या आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने दफन/दहनाचे कार्य सुरू आहे.

कोरोनामुळे मृत्यू झालेल्या व्यक्तींचे नातेवाईक, मुले, मुली जवळ येत नाहीत अशा संकटकाळी ‘हप्पीक्लब’चे कार्यकर्ते मृतदेहाला अग्नी देतात. कोणताही मोबदला व्यक्तींकडून, महापालिकेकडून स्वीकारत नाहीत.

व्यक्तीला कोरोनाची लक्षणे दिसत असतील तर कोरोना तपासणी करण्यास सांगितले जाते. कोरोना तपासणी करण्यासाठी जाताना काही नातेवाईक, मुलं, मित्र सोबत असतात, त्यांना धैर्य देतात. सकारात्मक रहा असा सल्ला देतात, कोरोनाशी लढले पाहिजे असेही म्हणतात. पण रिपोर्ट पॉझिटिव्ह आला की सर्व सल्ला देणारे, धैर्य देणारे पळून जातात, त्या व्यक्तीशी अंतर ठेवूनही बोलत नाहीत. ही मंडळी घरी येऊ नका असेही स्पष्ट बोलतात. रिपोर्ट येण्यापूर्वीचं असणारं प्रेम पॉझिटिव्ह रिपोर्ट आल्यानंतर शत्रू बनतं. त्यात त्याचा मृत्यू झाला तर त्या घरच्या लोकांवर बहिष्कार टाकतात. तेव्हा मदतीला हप्पी क्लबचे सदस्य पुढे येतात. प्रेताला अग्नी देतात. असे धाडस हप्पी क्लबच्या कार्यकर्त्यांत आहे.

कोरोनाच्या सुरुवातीच्या काळात महापालिकेच्या आरोग्य विभागाचे पाच कर्मचारी कोरोनाने मृत्यू झालेल्या प्रेतांवर अंत्यसंस्कार करीत होते. प्रेतांची संख्या वाढली, तेव्हा काही वर्षांपासून बेवारस प्रेतांवर अंत्यसंस्कार करणाऱ्या हप्पी क्लबचे मोहंमद सोहेब यांनी पुढाकार घेऊन, जोखीम पत्करून, आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मदतीला धावून गेले. हप्पी क्लबच्या कार्यकर्त्यांना महापालिकेने

प्रेत कसे हाताळावे, पी.पी.ई. कीटचा वापर केव्हा व कसा करावा, कागदपत्रे कशी पूर्ण करावीत याचे प्रशिक्षण दिले. 'जिथे नाही कोणी, तेथे आम्ही' या ब्रीदवाक्यानुसार ते कार्य करतात. घरच्या लोकांना कार्यकर्त्यांच्या जीवाची काळजी असल्यामुळे त्यांना घरातून विरोध आहे.

रत्नागिरी : माणुसकी धर्मापलीकडे : कोरोना झालेल्या अथवा कोरोनाबाबत संशय असलेल्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास नातेवाईक खांदा देणे दूरच, मृतदेहाकडे पाहातसुद्धा नाहीत. खेड येथील एका कोरोनाबाधित नसलेल्या व्यक्तीचा विदारक अनुभव-

खेड येथील प्रभाकर वाघ यांचा जिल्हा रुग्णालयात मृत्यू झाला. त्यांच्यासोबत त्यांचा पंधरा वर्षाचा मुलगा आणि त्यांची आई होती. प्रभाकर वाघ कोरोनाबाधित नव्हते. त्यांचा कोरोना रिपोर्ट निगेटिव्ह होता. तरी, अंत्यसंस्कार गावात करण्यासाठी नातेवाईकांचा, गावकऱ्यांचा विरोध होता. मुलगा व आई हतबल झाले. त्यांचे रत्नागिरीत कोणीही नातेवाईक नव्हते. तेव्हा संकल्प युनिक फाऊंडेशनचे अध्यक्ष दिलावर कोंडकरी, शकील गवाणकर, ईस्माइल नाकाडे, सईद मुल्ला, युसुफ शिरगावकर यांनी अंत्यसंस्कार केले. संकल्प युनिक फाऊंडेशन ही रत्नागिरीतील गरिबांसाठी विनामोबदला कार्य करणारी संस्था आहे. कोरोनाकाळात मृत व्यक्तींचे दहन/दफन करीत आहेत.

कोरोनाच्या सुरूवातीच्या काळात सर्व कष्टकरी वर्गाची स्थिती अत्यंत हालाखीची होती. इथल्या मातीत जन्माला आलेल्या मुसलमानाची स्थिती अधिक कठीण होती. काही ठिकाणी हिंदू व मुसलमानांना वेगळे कोविड सेंटर, क्वारंटाईन सेंटर असावेत, अशी मागणी पुढे आली होती. तेही याच देशाचे नागरिक आहेत हे बहुसंख्याकांनी समजून घेणे आवश्यक आहे.

मुस्लीम समाजात जकात (अनिवार्य दान) हा इस्लाममधील पाच स्तंभापैकी एक स्तंभ आहे. आपल्या संपत्तीच्या बचतीवरील संपत्तीतील अडीच टक्के रक्कम समाजातील गरजवंतांमध्ये दान करावी, असा नियम आहे. मुस्लीम समाज दरवर्षी रमजान ईदला ही रक्कम दीन-दुबळ्यांवर, गरजवंतांवर खर्च करते. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र शासनाच्यावतीने केलेल्या आवाहनानुसार मुस्लीम समाजाने आपली जकातची रक्कम आणि सदका (अचानक आलेल्या आपत्तीवर ऐच्छिक दान)ची रक्कम आणि रमजान साधेपणाने साजरा करून उरलेली रक्कम अशी तीन पद्धतीने जमा झालेली रक्कम कोरोना विरुद्धच्या लढाईत खर्च केली आहे.

कोरोनाच्या काळात मुस्लीम समाजाने क्वारंटाईन सेंटर उभारण्यासाठी,

देशातील अनेक मस्जिदीचे हॉल, मदरसे खुले केले आहेत. तर प्लाझ्मा थेरपीसाठी अनेकांनी रक्तदान केले. अनेक गरीबांना नियमित अन्नधान्याचे वाटप करीत आहेत. देशावर आलेल्या प्रत्येक आपत्तीच्या काळात शासन, प्रशासन आणि इतर समाजाच्या बरोबरीने काम करणाऱ्या मुस्लीम समाजाने या मदतीतून आपली सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. उद्धव ठाकरे म्हणतात, ''कोरोनाच्या काळात मुस्लीम समाजाने जे उत्कृष्ट कार्य केले, महाराष्ट्र राज्य कदापि त्यांना विसरणार नाही. त्यांचे उपकार देश कधीच विसरणार नाही.''

मुस्लिमांना नेहमीच लक्ष करणाऱ्या, हिंदु-मुस्लीम वाद निर्माण करणाऱ्या मीडिया व समाजमाध्यमांना आपल्या सामाजिक बांधीलकीच्या कार्यातून मुस्लिमांनी उत्तर दिले आहे.

◆

कोरोना : मुस्लीम समाजाने हिंदूंना केलेली मदत

लेखक : विलास रणसुभे

पुस्तिका मिळण्याचे ठिकाण

१) आपणास कोल्हापूर शहरात पुस्तिका हवी असल्यास येथे संपर्क साधा.

श्रीपती मगर, मोबा. : ९४२०१३६८६८

श्रमिक प्रतिष्ठान

रेड फ्लॅग बिल्डिंग, के.डी.सी. बँकेशेजारी,

बिंदू चौक, कोल्हापूर (वेळ : स. ११.०० ते सायं. ५.००)

२) बँक खात्याचे नाव

श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर

बँक ऑफ महाराष्ट्र (सेव्हिंग खाते)

लक्ष्मीपुरी शाखा

IFC : MAHB-0000018

A.C.No.: 60327207805

- वरील खात्यावर पैसे भरणा केल्यास पुस्तिका पाठविण्यात येईल.
- पुस्तिका कुरिअरने हवी असल्यास त्याची स्वतंत्र रक्कम भरावी लागेल.
- पन्नास व त्यापेक्षा जास्त प्रती घेतल्यास किमतीत सवलत मिळेल.
- पुस्तिकेची किंमत २० रु. असल्याने एक प्रत पाठविली जाणार नाही.
- कमीत कमी पाच ते दहा प्रती घ्याव्यात.

विक्री संपर्क

१) आनंदराव परुळेकर – ९४२३२६४९३९

२) एस. बी. पाटील – ९४०३५४९९८३

नुकतीच प्रसिद्ध झालेली पुस्तिका

एन. आर. सी. म्हणजे काय ?

लेखक : मिलिंद मुरुगकर

किंमत रु. २०/–

श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर.